मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ९ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • सप्टेंबर - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

**बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

अंक ९ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • सप्टेंबर २०१८



संपादक
**राजेंद्र थोरात**
(अवैतनिक)

सहसंपादक
**सुरेश तिर्लोटकर**

सजावट व चित्रे
**उदय सत्यवान पांगे** **राजनंदन पिंपळकर**



संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org



**लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही**


| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |


मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९





## कथा


- राजा अर्जुन व वालीकडून .. ०६
- डोळे उघडले ०८
- वेळ आणि धैर्य १४
- मुंग्यांशी पंगा ४२
- दिसतं तसं नसतं ४८








## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- असे होते ईश्वरचंद्र ..... ०५
- तेजस्विनी -७७ २०
- दुर्गभ्रमंती २२
- अंतर्बाह्य गोड राहू २९
- आपले जिल्हे ३०
- समर्थ दर्शन -४७ ३४
- संस्कृती संवर्धनाचं पर्व ४४
- पक्षीजगत ४७





## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६





## कविता


- छान दोस्ती २१
- दहिहंडी ३५
- देवता ४३

# शिक्षण म्हणजे स्वावलंबन व आत्मविश्वास

आपली मुलं शिकली पाहिजेत. उच्चशिक्षित झाली पाहिजेत ही प्रत्येक मातापित्याची इच्छा असते. यात वावगं काही नाही. पण आजकालच्या शिक्षणाला मात्र ते उपजीविकेचं साधनच समजतात. आणि पुढे काय ?... तर नोकरी ! लठ्ठ पगाराची नोकरी देणारं शिक्षण हेच उत्तम शिक्षण असा समज सर्वांचाच आहे. सगळ्यांचीच तिकडे धावाधाव. गुलामगिरीचीच इच्छा. फक्त नोकरीसाठीच शिक्षण. पगाराची निश्चिती ! पूर्वी लहानापासून थोरापर्यंत अगदी सहज पण खात्रीपूर्वक म्हणत असत, उत्तम शेती-मध्यम व्यापार-कनिष्ठ नोकरी. पूर्वीच्या शिक्षणात विचारसरणीत बेजबाबदारपणा, कष्ट न करणे याला थाराच नव्हता. आत्मविश्वास तर ओतप्रोत भरला होता. परंतु सुसंस्कारासाठी, जबाबदारी घेण्यासाठी, ती पेलण्यासाठी वैचारिक स्वातंत्र्यासाठी शिक्षण घ्यावे याकडे पुरेपूर दुर्लक्ष केले जात आहे. ते समजूनच घेतलेले नाही. मानसिक गुलामगिरीतच आपण अडकून पडलो आहोत.

माणसाला जन्मजात बुध्दी असते, कौशल्य असते, क्षमता असते. यांच्या विकासासाठी परिस्थिती तर अनुकूल लागतेच पण त्याचवेळी माणसाचे त्यासाठी कष्ट, परिश्रमही आवश्यक असतात. निसर्गात निरीक्षण केल्यास काय आढळून येते ? पक्ष्यांची पिले, प्राण्यांची पिले ही जास्तवेळ आपल्या आई-वडिलांवर अवलंबून राहत नाहीत. ती आई-वडिलांचे शिक्षण, मार्गदर्शन त्वरीत आत्मसात करतात आणि त्या परिस्थितीत स्वतंत्र वावरण्यास सक्षम बनतात, उलट मानवप्राणी आई-वडिलांवर जास्त वेळ अवलंबून राहतात. निसर्गाचीच योजना तशी आहे. माणसांचा विकास त्या योजनेनुसार होणार. आपल्या कुटुंबात, समाजात राहून त्याचे निरीक्षण, अनुकरण करुनच बाळाचे व्यक्तिमत्त्व हळूहळू घडते. व्यक्तिमत्त्व सर्वांगानी घडत असताना त्यामध्ये शिक्षणाची भूमिका महत्त्वाची ठरते. मुलं चौकस असतात, चिकित्सक असतात, अनुकरणप्रिय असतात, ग्रहणशिल असतात. त्यांचे मन आजूबाजूचे सर्व न्याहाळते, निरीक्षण करते, जे भावते, पटते ते ग्रहण करते. घरातील वडिलधारी व्यक्तींनी जाणीवपूर्वक काही आचार-विचार, सुसंस्कार केले तर मुलांच्या नैसर्गिक क्षमतेच्या विकासाला ते सहाय्यभूत होतात. मानवाच्या विकासामध्ये औपचारिक शिक्षणाचे योगदान फार मोलाचे असते, असे शिक्षणतज्ज्ञांना वाटते.

निरनिराळ्या क्षेत्रामध्ये ज्ञान विकसित होत आहे. त्याचा परिणाम प्रत्यक्ष जीवनावर होत आहे. माणसाने आपली बुध्दिमत्ता आणि अफाट परिश्रम घेऊन एक आगळे असे ज्ञानविश्व बनविले आहे. ते समजण्यासाठी शिक्षणाची फारच आवश्यकता असते. आतापर्यंत मिळविलेल्या माहितीचा उपयोग प्रत्यक्षात करण्यासाठी कौशल्याची जरुरी असते, आणि हे सगळे शिक्षणातूनच मिळावे अशी अपेक्षा असते. आजच्या शिक्षणात माणुसकीचे शिक्षण दिले जाते का ? मग हे कार्य कुणाचं आहे ? यासाठी शिक्षणाला स्वावलंबनाची व आध्यात्मिकतेची जोड देणे ही काळाची गरज आहे.

- राजेंद्र थोरात

# असे होते ईश्वरचंद्र विद्यासागर



एका छोट्याशा रेल्वे स्टेशनवर आगगाडी येऊन थांबली. एक प्रवासी हातात सुटकेस घेऊन डब्याच्या दारात उभा राहून हाका मारु लागला, हमालऽ हमालऽऽ, कुलीऽ कुलीऽऽ. त्याने इकडे-तिकडे पाहिले पण त्याला कोठेच हमाल दिसला नाही. छोटे स्टेशन असल्यामुळे गाडी दोन मिनिटेच थांबणार होती. तो सामान घेऊन खाली उतरला. स्टेशन मास्तरकडून त्याला समजले, की तेथे हमाल मिळणार नाही.

तो प्रवासी त्रासिक चेहऱ्याने इकडे-तिकडे पाहू लागला. तोच एक माणूस पुढे आला व म्हणाला, "मी घेऊन येतो तुमचं सामान." नंतर त्याने विचारले, "आपल्याला कुठं जायचं आहे ?" प्रवासी म्हणाला, "मला एका खास व्यक्तीला भेटायला जायचं आहे."

"कोणाला ?"

"ईश्वरचंद्र विद्यासागर यांना. तू त्यांना ओळखतोस का ?"

"हो, चला मी नेतो तुम्हाला त्यांच्याकडे."

घरी गेल्यानंतर त्या माणसाने प्रवाशाचे सामान एका बाजूला ठेवले. एक खुर्ची पुढे ओढून तो म्हणाला, बसा - बोला, काय काम आहे ईश्वरचंद्र विद्यासागरांकडे ? मीच ईश्वरचंद्र विद्यासागर आहे.

ते ऐकून तो प्रवासी ओशाळला आणि ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या पाया पडला.

असे होते ईश्वरचंद्र विद्यासागर. या महान विभूतींचा जन्म २६ सप्टेंबर १८२० या दिवशी मदनापूर जिल्ह्यातील वीर सिंह गावातील एका गरीब ब्राह्मण कुटुंबात झाला होता. त्यांच्या वडिलांचे नाव ठाकूरदास बंधोपाध्याय व आईचे नाव भगवतीदेवी होते.

वयाच्या २१ व्या वर्षीच सप्तशास्त्रज्ञान मिळवून त्यांनी 'विद्यासागर' पदवी मिळवली होती. पोर्टविल्यम कॉलेजात अध्यापनाचे काम ते करु लागले. त्यानंतर ते संस्कृत कॉलेजमध्येच अध्यक्ष नेमले गेले. समाजसुधारणेची प्रेरणा त्यांना आपल्या आई-वडिलांकडून मिळाली. बालविवाह प्रथा बंद करण्यासाठी व बाल विधवांच्या पुनर्विवाहासाठी ते आजीवन लढत राहिले. विद्यासागर मानवप्रेमी होते. माणसाच्या प्रगतीचा ते रात्रंदिवस विचार करीत असत. शाळेत विद्यार्थ्यांना मारण्याच्या विरोधात ते होते.

(साभार) ▢▢▢

पौराणिक कथा

# राजा अर्जुन व वालीकडून रावण पराभूत



युध्दपिपासू रावण मग महिष्पती नावाच्या नगरीत आला व तिथल्या अर्जुन नावाच्या राजाला त्याने युध्दाचे आव्हान दिले, परंतु राजा राजधानीबाहेर गेला असल्याचे त्याला कळले. मग राजा रावण विंध्यगिरीची शोभा पाहत नर्मदा नदीच्या तटावर पोहोचला. पश्चिम समुद्रवाहिनी नर्मदा मोठी सुंदर व संपन्न भासत होती. रावण पुष्पक विमानातून त्वरेने उतरला व त्याने नर्मदेच्या जलात स्नान केले. ही साक्षात गंगा आहे, असेच रावणाला वाटले. नर्मदेच्या तटावर रावणाने वाळूचे एक शिवलिंग स्थापन केले व भक्तिपूर्वक त्या शिवलिंगाची पूजा केली.


तेथून थोड्याच अंतरावर राजा अर्जुन आपल्या राण्यांसह जलविहार करीत होता. या अर्जुनाच्या सहस्त्रबाहुंमुळे नर्मदेचे प्रवाही जल अडविले गेले. त्यामुळे नर्मदेचे जल, रावण शिवलिंगाची पूजा करीत होता त्या दिशेने फुगले व पसरत गेले. त्यामुळे रावणाची सारी पूजा सामग्री वाहून गेली व त्याची पूजा अर्ध्यावरच राहिली.

राजा अर्जुनाच्या जलक्रीडेमुळे आपली पूजा अर्ध्यावर भंग पावली, हे जेव्हा रावणाच्या लक्षात आले, तेव्हा रावणाने अर्जुनाला युध्दाचे आव्हान दिले. मग रावण सेना व अर्जुनाची सेना यांच्यात घनघोर युध्दाला प्रारंभ झाला. नर्मदेच्या तटावर एकच कोलाहल उसळला. राजा अर्जुनाबरोबर जलक्रिडा करणाऱ्या त्याच्या सर्व राण्या भयभीत झाल्या. त्यांना घाबरु नका ! म्हणून धीर देत राजा अर्जुन मग स्वत:च रणात

उतरला. रावण व राजा अर्जुन यांच्यात गदायुध्दाला प्रारंभ झाला. राजा अर्जुनाने पराक्रमाची शर्थ केली व रावणाला गदेच्या प्रहाराने घायाळ केले. रावण एक धनुष्य मागे हटला व आर्तनाद करीत खाली बसला, तशी झडप घालून अर्जुनाने त्याला पकडले व आपल्या हजार हातांचा वापर करुन त्याला मजबूत दोराने बांधून टाकले. रावणाची बंधनातून सुटका करण्यासाठी त्याचे सेनापती धावून आले, परंतु अर्जुनाने आपल्या युध्दकौशल्याने त्या सर्व राक्षसांना पळवून लावले. रावणाला कैद करुन मग राजा अर्जुन आपल्या सेनेसह वाजत-गाजत आपल्या नगरीत आला. राजा अर्जुनाच्या या देवदुर्लभ पराक्रमासाठी नगरवासीयांनी त्याच्यावर फुले व अक्षता उधळल्या. राजाच्या नावाचा जयघोष, तर रावणाचा धिक्कार करणाऱ्या घोषणा दिल्या. अशाप्रकारे रावणाचा त्याने दारुण पराभव केला.

रावण एकदा वालीच्या किष्किंधापुरीत पोहोचला व वालीला युध्दाचे आव्हान करु लागला. तेव्हा वालीचे मंत्री, तारेचे वडील सुषेण, युवराज अंगद त्याला म्हणाले,"रावणराज, चारी समुद्राजवळ संध्योपासना करण्यासाठी वाली गेले आहेत. ते आता येतच असतील. इथे जे शंखासारख्या उज्ज्वल हाडांचे ढीग लागले आहेत, ते वालीशी युध्द करण्यासाठी आलेल्या तुमच्यासारख्या वीरांचेच आहेत. लवकरच तुम्हाला वालीचे व तुमच्या मृत्यूचे दर्शन घडेल. तुम्हाला जर मृत्यूची फारच घाई झाली असेल, तर दक्षिण समुद्राच्या तटावर जा. तिथे तुम्हाला पृथ्वीवर उभ्या असलेल्या अग्नीप्रमाणे वालीचे दर्शन होईल." तेव्हा मंत्र्याची हेटाळणी करीत रावण दक्षिण समुद्राकडे गेला. तिथे पुष्पक विमानातून उतरुन तो मांजराच्या पावलांनी गुपचूप वालीकडे धावला, परंतु रावण आल्याची व त्याच्या मनात काहीतरी काळेबेरे असल्याची चाहूल आधीच वालीच्या मनाला लागली होती. वाली निर्धास्तपणे संध्येत मग्न होता. रावणाला त्याने अगदी जवळ येऊ दिले आणि मग गपकन् झडप घालून वालीने त्याला आपल्या खाकेत दाबले. रावणाला घेऊन वालीने उड्डाण केले. तो आकाशाच्या मध्यभागी आला. रावण स्वत:ची सुटका करुन घेण्यासाठी निष्फळ धडपडत होता. मागून रावणाचा मंत्रिगण धावत होता, परंतु वालीने कुणालाच दाद दिली नाही. अतिशय वेगाने वाली उड्डाण करीत होता. रावणाला काखेत दाबूनच तो पश्चिम समुद्रतटावर आला. तेथे त्याने संध्योपासना केली. नंतर रावणाला बगलेत दाबूनच उत्तर, दक्षिण व पूर्व अशा चारी समुद्रतटांवर त्याने निश्चिंत मनाने संध्योपासना केली. मांजराच्या तोंडात सापडलेल्या उंदरासारखा रावण वळवळत होता, परंतु वालीने कुठेही आपली रावणावरची पकड ढिली होऊ दिली नाही. रावणाला ओढून थकलेला वाली शेवटी किष्किंधापुरीच्या वनात उतरला. रावणाला त्याने थोडे मोकळे केले व विचारणा केली, "सांग, आता तू कुठून आला आहेस?" रावण मनोमन चांगलाच हबकला. वालीच्या तडाख्यातून आपली सुटका झाली म्हणून त्याला थोडे हायसे वाटले. तो नरमाईच्या सुरात वालीला म्हणाला, "वानरेंद्रा, आपल्या अंगच्या अद्‌भूत बलाने तू मला थक्क केले आहे. माझ्या युध्दखोर वृत्तीची तुम्ही चांगलीच खोड जिरवलीत. मी आता तुमच्या मित्रत्वाची-स्नेहाची अपेक्षा करतो." वालीनेही दोस्तीसाठी हात पुढे केला. रावण मग किष्किंधानगरीत वालीचा सन्माननीय पाहुणा म्हणून चांगला महिनाभर राहिला व नंतर लंकेला परतला. **(साभार)**

❍ **क्रमशः**



कथा

# डोळे उघडले

संत एकनाथांच्या काळातली ही घटना आहे. शिवमभट नावाचा एक कर्मठ ब्राह्मण होता. संत  एकनाथ दलित व शूद्र व्यक्तींना जवळ करतात ही गोष्ट त्याला खटकत असे. या लोकांना स्पर्श करणे पाप आहे असे त्याचे ठाम मत होते. त्यामुळे तो नाथांवर नेहमी टीका करत असे. त्याचे असे वागणे त्याच्या पत्नीला आवडत नव्हते. ती नाथांची भक्त होती. त्यांच्या किर्तनाला नित्यनेमाने जात असे.

एके दिवशी शिवमभट दुपारी घरी आला. त्याची पत्नी नाथांकडे साधूसंतांच्या दर्शनासाठी गेली होती. त्यामुळे त्याच्या रागाचा पारा चढला

होता. उन्हातून आल्यामुळे त्याला तहानही लागली होती; परंतु पाणी द्यायला पत्नी घरात नाही हे पाहून तर त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

थोड्या वेळाने पत्नी घरी आली. तिच्यावर खेकसत त्याने पाणी मागितले. ती पाणी आणायला लगबगीने आत गेली. हंड्यावरचे झाकण उघडून त्यात लोटा बुडवत असताना छतावरची पाल नेमकी पाण्यात पडली. ते पाणी तसेच टाकून ती शेजारी धावली. शेजारच्या गणू कुंभाराकडून तिने लोटाभर पाणी आणले. मडक्यातले ते थंडगार पाणी प्यायल्यावर शिवमभटचा राग थोडा शांत झाला. त्याने विचारले, "पाणी किती थंडगार आणि मधुर होतं; आज कुठल्या विहिरीवरुन पाणी भरलं?"

पत्नीने घडलेला प्रसंग सांगितला. त्यावर संतापाने उसळून शिवमभट ओरडला, "चांडाळणी, त्या क्षुद्र कुंभाराच्या घरचं पाणी मला पाजलंस? लाज नाही वाटत? आपण ब्राह्मण आहोत, हेही ठाऊक नाही? या क्षूद्र लोकांच्या कुठल्याही वस्तूला स्पर्श करणं पाप आहे."

पत्नी घाबरतच म्हणाली, "क्षमा करा, यापुढे अशी चूक होणार नाही." दुसऱ्या दिवशी शिवमभट घरी आला. पत्नीला म्हणाला, "खूप भूक लागलीय, जेवायला वाढ."

पत्नी म्हणाली, "आज काहीही बनवलं नाही."

"काय भाकऱ्या बनवल्या नाहीत?"

"नाही, कारण तवा त्या क्षूद्र लोहाराने बनवलेला असल्याने मी तो फेकून दिला."

"अगं मग दूध तरी आण."

"तेही मी फेकून दिलं. त्या क्षूद्र गवळ्याने दिलेले होते ते. मी तर त्याला उद्यापासून येऊ नकोस म्हणून सांगून टाकलंय."

"बरं पाणी तरी आण, घशाला कोरड पडलीय."

"मी तर घरातलं सगळं पाणी फेकून दिलं. कारण त्या क्षूद्र पाथरवटांनी, गवंड्यांनी बनवलेल्या विहिरीचं पाणी होतं ना ते!"

शिवमभट वैतागत मनाशी म्हणाला, काय कटकट आहे ही, चला बाहेर जाऊन येऊ या.

"अगं माझ्या चपला कुठं आहेत?"

"अहो, त्या क्षूद्र चांभाराने बनवल्या होत्या म्हणून मी त्या फेकून दिल्या. आता घरातलं धान्यही वाटून टाकते. त्या क्षूद्र कुणब्यांनी पिकवलेलं धान्य कशाला हवंय घरात? मी तर म्हणते हे घरही आपण देऊन टाकू. हे तरी कुठे ब्राह्मणांनी बांधलय!"

आता मात्र शिवमभटाची चांगलीच कोंडी झाली. तिच्यापुढे तो काहीही बोलू शकला नाही. शेवटी हात जोडत म्हणाला, "लक्ष्मी, मी चुकलो. जन्माने कोणी महान होत नाही आणि व्यवसायाने कोणी लहान होत नाही. प्रत्येकजण एक-दुसऱ्याला पूरक आहे. कुणीही श्रेष्ठ नाही आणि कुणीही नीच नाही, हेच खरे!" आज तू माझे डोळे उघडले. जातीभेदाने मी अंध झालो होतो.

❑❑❑

# शब्दकोडे १७०

○ पूजा अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ■ | १ | ■ | २ | | | ३ |
| ४ | | | | ■ | ■ | |
| ■ | | ■ | ५ | ६ | | |
| ७ | | | ■ | | ■ | ■ |
| ८ | | ■ | ९ | | | १० |
| | ■ | ११ | | ■ | ■ | |
| ■ | १२ | ■ | १३ | | १४ | |
| १५ | | | | ■ | | ■ |

## आडवे शब्द

२. शिकागो शहर कोणत्या देशात आहे ?
४. सार्थक याचा विरुध्दार्थी शब्द
५. माऊंट अबू हे थंड हवेचे ठिकाण या राज्यात आहे.
७. गटात न बसणारा शब्द : मावशी, बाजरी, आजोबा, पुतणी
८. शत्रूच्या गटातील मााहिती गुप्तपणे काढणारा
९. घड्याळ बांधण्याची जागा
११. रावणाची तोंडे किती ?
१३. मुख्यमंत्र्यांची नेमणूक हे करतात
१५. दुर्योधनाचे वडील

## उभे शब्द

१. हजर याच्या विरुध्द
२. क्रिकेट टीमचे एकूण खेळाडू
३. हिरा हा ....... या मूळ तत्वापासून बनलेला आहे
६. उगवत्या सूर्याचा देश असे ....... देशाला म्हटले जाते
७. गटात न बसणारा शब्द : मोसंबी, गाजर, बटाटा, बाहेर
९. सर्वाधिक साखर कारखाने कोणत्या राज्यात आहेत ?
१०. संदेशवाहनाचे एक साधन
१२. बोलाचा ...... अन् बोलाची कढी (म्हण)
१४. डॉ. राधाकृष्णन यांचा वाढदिवस सप्टेंबर महिन्याच्या ...... तारखेला साजरा करतात.

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारु या

**प्रश्न : मानव जातीत सर्वत्र असमानता दिसून येते, असे का ?**

**उत्तर :** कर्मसिध्दांतानुसार मानवजातीत असमानता दिसण्याचं मुख्य कारण म्हणजे माणसाचं कर्म! कर्मामुळेच कुणी विद्वान तर कुणी मूर्ख, कुणी संत तर कुणी क्रूर. कुणी सुदृढ तर कुणी व्याधीग्रस्त दिसून येतो. ही भिन्नता दिसून येण्यामागे काहीतरी कारण निश्चित आहे. माणसाने केलेल्या कर्माचं फळ प्रारब्धरुपाने ज्याला आपण भोग म्हणतो त्या रुपाने समोर येऊन उभं राहतं. हे भोग चांगले असतील किंवा वाईट असतील ही केलेली कर्म या जन्मातील असतील किंवा मागील जन्मातील. चांगल्या कर्मामुळे सुखोपभोग तर वाईट कर्मामुळे दु:ख-व्याधी-अडचणी अर्थात हा निसर्गाचा नियमच आहे. जसे पेरावे तसे उगवते.

**प्रश्न : माणसाच्या जीवनात अनेक प्रकारची दु:खं येतात, त्यावेळी असे का म्हटले जाते, की दु:खाचाही स्वीकार आनंदाने करावा ?**

**उत्तर :** सुख-दु:ख ही सर्वस्वी कर्माची फळं असतात असं कर्म सिध्दांत सांगतो. हे कर्मभोग ज्याचे त्यालाच भोगावे लागतात. ते कोणालाही टाळता येत नाहीत. मग भले ते अवतारी पुरुष का असेनात. त्यामुळे जे भोग येतील ते भोगून संपवले, की जीव त्या ओझ्यातून मुक्त तरी होईल. भूतकाळातील घटना घडून गेल्या. त्या बदलता येणार नाहीत. परिणामी त्याची फळं बदलता येणार नाहीत. म्हणून त्यांचा स्वीकार करुन ते संपून जाणे आपल्या हिताचेच आहे. भूतकाळ जरी हाती नसला तरी वर्तमान आपल्या हाती आहे. जे क्षण आपल्या हातात आहेत ते सत्कारणी लावावे. ते सत्कर्मात, सत्संगात, स्मरणात व्यतीत करावेत म्हणजे येणारा भविष्यकाळ आपला दु:खदायी होणार नाही. काही वेळा अनावधनाने आपल्या हातून चुका घडतात. आपल्या नकळत घडलेल्या कृतीने, शब्दाने कुणी दुखावला जातो. त्यामुळे रोज ईश्वराकडे क्षमायाचना करावी. रात्री झोपण्यापूर्वी नामस्मरण करावे.

**प्रश्न : पूर्वी ऋषी-मुनी तपश्चर्या का करत असत ?**

**उत्तर :** ईश्वरदर्शनाची तळमळ किंवा अलौकिक सिद्धी-शक्ती प्राप्त करण्यासाठी पूर्वी ऋषी-मुनी तपश्चर्या करत असत. याचा अर्थ असा नाही, की आता ब्रह्मज्ञान प्राप्त झालं तपश्चर्येची गरज नाही. खरं तर ज्ञान प्राप्तीनंतरच तपाचरण होत असतं. पाच प्रण-तीन कर्मे यांचं तंतोतंत पालन काया-वाचा-मनाने करणे हेच खरं तप आहे. त्यामुळेच ब्रह्मज्ञान टिकून राहते. म्हणून ज्ञानीयाला तर तपाचरणाची अधिक गरज आहे.

❏❏❏



विचारपुष्प

# संत प्रवृत्ती

आज सत्संगामध्ये नमस्काराची रांग जस-जशी पुढे सरकत होती, तेव्हा प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक निष्पाप हास्य दिसत होतं. ते पाहून निरंकाराची धन्यताच प्रकट होत होती, असेच सर्व संत सदैव खूश रहावेत. हे निरपेक्षीत हास्य आपल्या चेहऱ्यावर दिसून येत होतं. त्यामुळे असा भाव येत होता, की संतांची जी प्रवृत्ती असते ती दिखावटीची नसते. अगदी सहजतेने या निराकारामध्ये नेहमी धन्यतेचा भाव प्रकट करणारी असते आणि ही संतांची

इच्छाशक्ती प्रचारात देखील असावी.

या इच्छाशक्तीच्या संदर्भातील एक गोष्ट वाचण्यात आली, की एका व्यक्तीला एका सभेला जायचे असतं. ती त्या वेळेची वाट पाहत होती, की ठीक आहे, सभा समाप्त होऊ दे आपण शेवटी जाऊ या, कारण सर्वांना आपण आलो आहोत हे कळेल. त्यानंतर आपण घरी निघून जाऊ. म्हणजे आपला वेळही वाचेल आणि सर्वांना आपण आलो हे सुध्दा कळेल. असा विचार करत करत ती ज्या ठिकाणी सभेचे आयोजन होते तिकडे जायला निघाली; परंतु पाहतो तो काय, ज्या रस्त्याने जायचं होतं त्या रस्त्याने न जाता ती दुसऱ्याच रस्त्याने जाऊ लागली. जिथं चालायचं होतं त्या बाजूने चालत नाही. असं दिसत होतं, की त्याच्यासमोरुन माणसं येत आहेत. तेव्हा त्याच्या ध्यानात येतं, की आपण उशीरा जाणार होतो, परंतु उशीर इतका झाला, की सभाच समाप्त झाली. कार्यक्रम संपून गेला असावा. लोक घरी जात आहेत. वास्तविक ज्या सभेला त्याला जायचे होते ती सभा चालूच होती, परंतु त्याची सुरुवातीपासूनच इच्छाशक्ती नसल्यामुळे तो शेवटीसुध्दा पोचू शकला नाही.

आपल्याला सुध्दा पूर्ण भान ठेवून चालायचे आहे, कारण निरंकार सर्वांच्या भावभावना जाणत आहे. आपण क्षणोक्षणी आपली भावना चांगली ठेवून निरंकाराची आठवण (स्मरण) करायची आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे संतांचं जीवन नेहमी एका गिर्यारोहकासारखं असतं. जसं एक गिर्यारोहक पर्वताच्या शिखरावर यासाठी जात नाही, की सर्व लोक मला पाहतील आणि माझी वाहवा करतील. पण तो याच्यासाठी चढतो, की आपलचं समाधान व्हावं, आपलं स्वप्नं पूर्ण व्हावं किंवा उंचावर गेल्यानंतर तिथून त्याला जग कसं दिसेल यासाठी तो वर जातो.

अशाच तऱ्हेने संतही कधी वाहवा मिळवण्यासाठी नाही, तर दासभावनेने उच्चस्थानी पोचतात.

सत्संगाला बाबाजींनी मातेचा दर्जा दिला आहे. तेव्हा दासी तुम्हा संताकडे एक मातेच्या रुपात शिरावरील मुकुटाच्या रुपात असणाऱ्या साधसंगतकडे हाच आशीर्वाद मागेल, की हा जो मंच आहे तो शिकवण्याचा नाही. जशी एक म्हण आहे, **Those who dare to teach must never cease to learn** (जे शिकवण्याचे धाडस करतात, ते कधीही शिकू शकत नाहीत.)

तुम्ही सर्वांनी आशीर्वाद द्या, क्षणोक्षणी सत्संगाची शिकवण आहे, त्याच तऱ्हेने प्रत्येक क्षण आपल्या चरणी व्यतीत होऊ शकेल.

**- प्रेमाने बोला, धन निरंकार जी।**

❑❑❑



कथा : रंजना भांगरे (मुलुंड-मुंबई)

# वेळ आणि धैर्य

एक साधू एका नदीकिनारी घाटावर बसून रोज जोरात म्हणत असे - 'आपणास जे पाहिजे ते मिळेल.' त्या ठिकाणावरुन पुष्कळ लोक येत-जात असत; परंतु कुणीही त्याच्याकडे लक्ष देत नव्हते. सर्वांना वाटायचे, की ही व्यक्ती वेडगळ आहे. एकदा एक तरुण त्याच्या जवळून जात असताना त्याने - 'आपणास जे पाहिजे ते मिळेल' हे साधूचे शब्द ऐकले. तो साधूजवळ गेला आणि त्याने विचारले, "महाराज आपण जे बोलत आहात त्याप्रमाणे मला जे पाहिजे ते मिळेल काय ?" साधू म्हणाला, "होय बाळ, तुला जे पाहिजे ते मी नक्की देईन; पण तुला माझी एक गोष्ट ऐकावी लागेल; प्रथम हे सांग की तुला काय पाहिजे ?" तरुण म्हणाला, "महाराज, मी हिरे-मोती यांचा मोठ्ठा व्यापारी होऊ इच्छितो."

साधू म्हणाला, “ठीक आहे, मी तुला एक हिरा आणि एक मोती देतो. भविष्यात तुला यापासून जेवढे हिरे आणि मोती बनवायचे असतील ते तू बनवू शकतोस.” साधूने आपला तळहात त्या तरुणाच्या एका तळहातावर ठेवला व म्हणाला, “मी तुला जगातील सर्वात किमती हिरा देत आहे. लोक त्याला ‘वेळ’ म्हणतात. हा कुठेही हरवू नकोस. यापासून तुला जेवढे हिरे बनवायचे आहेत, ते तू बनवू शकशील.” तो युवक थोडा विचारात पडला. साधूने लगेच दुसरा तळहात युवकाच्या दुसऱ्या तळहातावर ठेवत म्हटले, “हा जगातील सर्वात किमती मोती आहे. लोक त्याला ‘धैर्य’ म्हणतात. धैर्य म्हणजे हिंमत. कुठल्याही परिस्थितीत स्थिर राहणे. जेव्हा कधी वेळ देऊनही इच्छित परीणाम मिळाला नसेल, तेव्हा धैर्य नावाचा मोती धारण कर.” तरुणाने साधूच्या या गोष्टीवर खोलवर विचार केला आणि त्याने ठरविले, की आजपासून आपण वेळ कधी वाया घालवायचा नाही. खूप मेहनत करायची.

तरुणाने व्यापारात खूप परिश्रम घेतले. आळस, निद्रा, ऐषोआराम यात तो अडकला नाही. आपलं ध्येय साध्य होत नाही तोपर्यंत अखंड प्रयत्न करत राहिला. यावेळी त्याला अनेकदा अपयश आलं, व्यापार बंद करावा असं वाटू लागलं. कधी कधी पळून जावंसही वाटलं; पण त्याने धैर्य नावाचा मोती म्हणजे कुठल्याही परिस्थितीत घाबरुन न जाता स्थिर राहण्याचा निश्चय केला. पुढे व्यापारात तेजी आली. त्याचं झालेलं नुकसानही भरुन निघालं, खूप फायदा झाला. पुढे त्याने हिरे-मोती विकण्याचा व्यवसायही सुरु केला आणि आपले स्वप्न खरे केले.

❑❑❑

## ज्ञानाचा प्रकाश गरजेचा

चांगल्या गोष्टीचे कौतुक करणे चांगली गोष्ट आहे, पण चांगल्या गोष्टी स्वीकारणे त्याहूनही चांगले आहे. परोपकारी संत महात्मा चांगल्या गोष्टी आपल्या जीवनात अंगीकारतात आणि पूर्ण प्रयत्नही करतात की या चांगल्या गोष्टी जगातील सर्व लोकांपर्यंत पोचाव्यात, हा ज्ञानाचा प्रकाश ठिकठिकाणी पोचावा. महापुरुष ठिकठिकाणी या निराकार प्रभू परमात्म्याचा प्रकाश पोचवतात कारण ते जाणतात, की अंधारातून केवळ ठोकरच मिळते आणि ज्या व्यक्तीला हा ज्ञानाचा प्रकाश मिळतो त्याच्या जीवनातून अंधकार नाहीसा होता, त्याचे जीवन प्रकाशमय होते. अंधार अंधाराला मिटवू शकत नाही, प्रकाश अंधाराला मिटवू शकतो. जसे प्रकाशासाठी एक दिवा असणे पुरेसे नाही, तर तो पेटवून वास्तविक प्रकाश प्राप्त करायचा असतो. त्याचप्रकारे केवळ ज्ञानाचा उल्लेख करणे, ज्ञानाच्या गोष्टी करणे, ऐकणे, ऐकविणे एवढेच पुरेसे नाही, जोपर्यंत आपण हे ज्ञान स्वत: अंमलात आणत नाही, आपला कर्ता भाव सोडून सद्‌गुरुची शिकवण आत्मसात करत नाही, तोपर्यंत बाहेरचा अंधार भलेही आपण दिवा लावून नाहीसा करु पण आतला अंधार संपणार नाही. आतील अंधार केवळ ज्ञानरुपी प्रकाशाने नाहीसा होऊ शकतो. एक तेवणारा दीपकच चौफेर प्रकाश करु शकतो, इतर अनेक दीपक पेटवू शकतो. आपल्या आतील वाईट गोष्टींना संपविण्यासाठी या ज्ञानाचा प्रकाश विनम्रतेने स्वत:ही धारण करायचा आहे आणि पुढेही पसरवयाचा आहे.

- सद्‌गुरु माता सविंदर हरदेवजी महाराज



# आजोबा

चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)

चित्रांकन -रंग : अजय कालडा







मोनू बसच्या खिडकीकडील सीटवर बसला होता. त्याच्या बाजूला चंदा आणि नंतर आजोबा बसले होते. त्यादिवशी फार सुंदर वातावरण होते. सर्वजण प्रवासाचा आनंद घेत होते.
काही वेळाने बसमध्ये एक मुलगी बेशुध्द पडल्याची गोष्ट कानावर पडली. मोनू आणि चंदा अचंबित झाले.
मोनू म्हणाला, चला पाहूया तरी मुलीला काय झालं आहे ते ? चंदा आणि आजोबा देखील म्हणाले, हो ! हो चला जाऊन पाहू या.


मोनू म्हणाला, मी एका पुस्तकात प्रथमोचाराबाबत वाचले आहे. लवकर पाणी द्या, तिला सीटवर बसवा, खिडकी उघडा व तिला हवा लागू द्या.
पाहिलंत! ती मुलगी शुध्दीवर येत आहे. चंदाजवळ काही संत्री होत्या. तिने त्यातील एक संत्री त्या मुलीला खायला दिली. मुलीला आता पहिल्यापेक्षा अधिक बरं वाटत होतं.
काही वेळाने मोनू आणि चंदा त्या मुलीबरोबर खेळू लागले.
हे पाहून त्या मुलीच्या आई-वडीलांनी त्या दोघांचे आभार मानले व म्हणाले, किती चांगली मुलं आहात तुम्ही. देव तुम्हाला खूप मोठं आयुष्य देवो!


थोड्याच वेळात एक सीट खाली झाली. मोनू, चंदा आणि आजोबा त्या सीटवर बसले.
सीटवर बसताच आजोबा म्हणाले, शाब्बास मुलांनो! तुम्ही फार सुंदरप्रकारे त्या मुलीची मदत केली.
मुलांनो, आपल्या सर्वांना अशाचप्रकारे प्रत्येक गरजवंताच्या मदतीसाठी तयार राहिले पाहिजे.
पुस्तक मेला
काही वेळाने पुस्तक मेळ्याचा बस स्टॉप आला. सर्वजण हसत-खेळत मेळ्याच्या दिशेने जाऊ लागले.

# सुवर्णकन्या - हिमा दास

केवळ दोन वर्षापूर्वी रेसिंग ट्रॅकवर उतरलेल्या हिमा दासने भारतासाठी मिळवलेले पहिले जागतिक सुवर्ण मुलामुलींमधील भेदभावांना मागे टाकणारे आहे. फिनलंडमध्ये २० वर्षांखालील जागतिक ॲथलेटीक्स अजिंक्यपद स्पर्धेत १८ वर्षीय हिमाने चारशे मीटर धावण्याची स्पर्धा जिंकली. जागतिक स्तरावर अशा स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारी ती पहिली भारतीय ॲथलिट.

आसामच्या नागाव जिल्ह्यातील कांधुलिमारी गावाची हिमा अवघ्या देशाची सुवर्णकन्या ठरली आहे. तिचे कुटुंब शेतकऱ्यांचे. आई-वडिल यांच्यासह कुटुंबातील सहा सदस्यांचा उदरनिर्वाह शेतीतून चालतो. मात्र, ती नेहमी सकारात्मक विचार करत राहिली. गावातील भाताच्या खाचरात एका शिक्षकाने तिला फुटबॉल खेळताना पाहिले. त्या वयातली तिच्यातली ऊर्जा पाहून ते थक्क झाले. त्यांनी तिला ताबडतोब ॲथलेटिक्समध्ये येण्याचा सल्ला दिला. नंतर तिची भेट निपोन दास या प्रशिक्षकांशी झाली. वाऱ्याच्या वेगाने धावणाऱ्या हिमाला पाहून दास यांनी तिच्यातील क्षमता हेरली आणि तिला गुवाहाटीला येण्याचा आग्रह धरला. घरापासून दीडशे किलोमीटर दूर मोठ्या शहरात पाठविण्यास पालक तयार नव्हते. मात्र, प्रशिक्षकांनी समजूत घातली आणि तिचा नवा प्रवास सुरु झाला. आज तिची चर्चा आहे ती तिने मिळवलेल्या यशाबरोबरच तिच्या धाडसाची. ही मुलगी काहीही करु शकते. असा तिचा आसामात लौकिकच आहे सर्वदूर. याचे कारणही तसेच. तिने एकटीने धाडसाने स्वत:च्या आणि आसपासच्या गावांमध्ये दारुबंदी घडवून आणली आहे. हिमा खूप हट्टी आहे. एकदा का तिने एखादी गोष्ट ठरवली, तर ती कोणाचे काही ऐकत नाही. ती आत्मविश्वासाने भिडते. असे तिचे वडील सांगतात. तिचा हा दृढनिश्चय तिला इथवर घेऊन आला आणि पुढेही सुवर्णमयी मार्गाने नेईल.

❏❏❏






कविता : सदानंद बामणे

# छान दोस्ती

एकदा उंदिर आंघोळीला गेला
खोल पाण्यात बुडू लागला

त्याला पाहून ससा धावला
उंदराला त्याने बाहेर काढला

उंदिर नि ससा दोस्त छान झाले
दोघे जंगलात फिरु लागले

अचानक शिकारी जंगलात आले
घाबरुन प्राणी पळू लागले

शिकाऱ्याने मग सशाला पकडले
जाळ्यामध्ये बांधून ठेवले

शिकारी सारे जेवायला गेले
उंदराने सशाला क्षणात सोडले

ससा नि उंदिर धुम्म पळाले
शिकारी बिचारे बघतच राहिले







# मल्हारगड

महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांमध्ये सर्वात शेवटी बांधला गेलेला किल्ला म्हणून मल्हारगड प्रसिध्द आहे. पुणे जिल्ह्याच्या दक्षिणेकडे वेल्हे तालुक्यातून सह्याद्रिच्या मूळ रांगेचे दोन फाटे फुटतात. एका डोंगररांगेवर राजगड आणि तोरणा तर दुसरी डोंगररांग ही पूर्वपश्चिम पसरलेली आहे. याच रांगेला भुलेश्वर रांग म्हणतात. पुरंदर, वज्रगड, मल्हारगड, सिंहगड याच रांगेवर वसलेले किल्ले आहेत. पुण्याहून सासवडला जाताना लागणाऱ्या दिवेघाटावर लक्ष ठेवण्यासाठी मल्हारगडाची निर्मिती केली गेली.

## इतिहास

या किल्ल्याची बांधणी पेशव्यांचे सरदार पानसे यांनी केली. पानसे हे पेशव्यांच्या तोफखान्याचे प्रमुख होते. मल्हारगडाचे बांधकाम १७५७ ते १७६० या काळात झाले. सन १७७१-७२ मध्ये थोरले माधवराव पेशवे किल्ल्यावर येऊन गेल्याचे उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये आढळतात. इंग्रजांविरुध्दच्या बंडात उमाजी नाईक व वासुदेव बळवंत फडके यांनी या किल्ल्याचा आश्रय घेतला होता.

## पाहण्याची ठिकाणे

पूर्वेकडच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर उजव्या बाजूने पुढे गेले असता बालेकिल्ल्याच्या तटाआधी आपल्याला एका वाड्याचे अवशेष दिसतात. बाजूलाच एक विहीरही आहे, मात्र ती वापरात नसल्याने गडावरील इतर विहिरींप्रमाणेच यात पाणी अजिबात नाही. बालेकिल्ल्यात प्रवेश न करता असेच तटाच्या बाजूने पुढे गेल्यावर समोरच एक बांधीव तळे लागते. या तळ्यात उतरण्यासाठी पायऱ्या बांधलेल्या आहेत. किल्ल्याच्या दक्षिणेला असणारे हे तळे बालेकिल्ल्याच्या तटाला लागून आहे. बालेकिल्ल्यातून तलावावर जाण्यासाठी तटबंदीत एक दिंडी दरवाजा बांधलेला आहे. तलाव पावसाळ्यात व हिवाळ्यात पाण्याने भरलेले असते. यातील पाणी वापरण्यास उपयुक्त असले तरी पिण्यायोग्य मात्र नाही.

तलावाच्या पुढे किल्ल्याच्या टोकावर असणाऱ्या बुरुजाकडे जाताना अजून एक विहीर लागते. याही विहिरीत पाणी नाही. या बुरुजाच्या खाली आपल्याला एक बुजलेला दरवाजा दिसतो. या बुरुजावरुन उजवीकडे पुढे गेल्यावर आपल्याला एक चोर दरवाजा दिसतो. झेंडेवाडी गावातून आल्यावर याच दरवाज्यातून आपण

किल्ल्यात प्रवेश करतो.

चोर दरवाजापासून बालेकिल्ल्याच्या तटबंदीच्या बाजूने मुख्य प्रवेशद्वाराच्या दिशेने चालत गेल्यावर बालेकिल्ल्याचे प्रवेशद्वार लागते. बालेकिल्ल्याचा तट चौकोनी असून काही ठिकाणी त्याची पडझड झाली आहे. बालेकिल्ल्यातील दोन मंदिरांची शिखरे आपल्याला किल्ल्याच्या पायथ्यापासून खुणावत असतात. ही दोन मंदिरे बालेकिल्ल्यात बाजूबाजूलाच असून यातील लहानसे देऊळ खंडोबाचे, तर दुसरे थोडे मोठे देऊळ महादेवाचे आहे. खंडोबाच्या देवळामुळेच या गडाला मल्हारगड हे नाव पडले असावे. महादेवाच्या देवळात शंकराची पिंडी असून या मंदिरात राहायचे झाल्यास फारतर ५ ते ६ माणसे दाटीवाटीने राहू शकतात.

पानसे (गढी) वाडा : पेशव्यांचे तोफखाना प्रमुख सरदार कृष्णराव माधवराव पानसे यांनी बांधलेली गढी मल्हारगडाच्या पायथ्याशी असलेल्या सोनोरी गावात आहे. गढीचे १२ फूटी उंच पश्चिमाभिमुख प्रवेशद्वार एखाद्या किल्ल्यासारखेच आहे. गढीला ६ बुरुज आहेत. बुरुजांमधील तटबंदीची जाडी ९ फूट व उंची १९ फूट आहे.

गढीत शिरल्यावर प्रथम लक्ष्मी-नारायणाचे मंदिर आहे. या मंदिरात संगमरवरात कोरलेली लक्ष्मी-नारायणाची मूर्ती आहे. या मूर्तीत गरुडाच्या खांद्यावर बसलेला विष्णु व त्याच्या डाव्या बाजूला लक्ष्मी दाखवलेली आहे. ही मूर्ती ७ मार्च १७७४ रोजी कर्नाटक स्वारीच्या वेळी मेळेकोट येथे केलेल्या लुटीत मिळाली होती. याशिवाय दगडात कोरलेली गरुडाची मूर्ती गाभाऱ्यातील कोनाड्यात ठेवलेली आहे. मंदिराच्या समोर पाण्याचं सुकलेलं टाकं आहे. तर मागच्या बाजूला पायऱ्या असलेली मोठी विहिर आहे. मंदिराच्या उजव्या व डाव्या बाजूस ३ छोट्या देवळ्या आहेत. त्याच उजव्या सोंडेचा गणपती, सूर्य यांच्या मूर्ती व शिवलिंग आहेत.

मंदिराच्या मागे असलेल्या विहिरीच्या बाजूला पानसे यांचा वाडा आहे. पानसे यांचा हा वाडा पूर्वी तीन मजली होता, आता केवळ एक मजली राहीला आहे. वाड्यातील शिसवी देवघर पाहण्यासारखे आहे. पानसे यांचा वाडा पाहून लक्ष्मी-नारायणाच्या मंदिराला वळसा घालून प्रवेशद्वाराच्या विरुध्द दिशेला चालत गेल्यावर ढासळलेली तटबंदी दिसते. या तटबंदीत रस्त्याच्या डाव्या बाजूस गणपतीचे मंदिर आहे. ते पाहून मागे फिरुन गढीच्या प्रवेशद्वारापाशी आल्यावर आपली गढीची फेरी पूर्ण होते.

## कसे जाल ?

सासवडपासून ६ कि.मी.वर सोनोरी हे गाव आहे. तिथे जाण्यासाठी सासवडहून एस.टी. बसेसची सोय आहे. सोनोरी गावातून कच्च्या रस्त्याने किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचण्यासाठी २० ते २५ मिनिटे लागतात.

पुण्याहून सासवडला निघाल्यावर दिवे घाट संपल्यावर काही वेळाने झेंडेवाडी गावाचा फाटा लागतो. येथून २ किमी वर झेंडेवाडी हे गाव आहे. गाव पार करुन आपल्याला समोरच्या डोंगर रांगामध्ये दिसणाऱ्या खिंडीत जावे लागते. गावात विचारल्यावर गावकरीही आपल्याला ती खिंड दाखवतात. या खिंडीत गेल्यावर समोरच याच डोंगररांगेमध्ये असणारा मल्हारगड आपल्याला दिसतो.

फक्त ५ ते ६ माणसे महादेवाच्या मंदिरात दाटीवाटीने राहू शकतात. गडावर अन्यत्र राहण्याची सोय नाही. मात्र पायथ्याला असणाऱ्या सोनोरी गावात किंवा झेंडेवाडीत शाळेच्या आवारात राहता येते.

किल्ल्यावर जेवणाची सोय आपणच करावी. सासवडला जेवणासाठी हॉटेल्स आहेत.

गडावर पिण्याच्या पाण्याची सोय नाही.

❐❐❐



# अनेक आजारांवर उपयुक्त जायफळ

खाद्यपदार्थांचा स्वाद वाढविण्यासाठी किंवा कोणत्याही पदार्थाला विशेष स्वाद आणण्यासाठी त्यात जायफळाचा उपयोग केला जातो; परंतु जायफळ हे नुसता स्वादच वाढवीत नाही, तर त्यामुळे अनेक आजारांमध्ये लाभही होतात. आमांशयावर तर जायफळ फारच गुणकारी आहे.

जायफळ आमांयशातील पाचक रस वाढविते. त्यामुळे भूक लागते. आतड्यांत पोहोचल्यानंतर तेथील गॅसची समस्या दूर करते. जास्त प्रमाणात घेतले तर- जायफळ हे मादकी ठरते व त्याचा प्रभाव म्हणून चक्कर येणे यासारखी अनेक लक्षणेही आढळतात. योग्य प्रमाणातील जायफळ सेवनाने अनेक आजारात मदत होते.

आयुर्वेदामध्ये जायफळाला वात व कफनाशक म्हटले आहे. जायफळाचे चाटण हे रोज सकाळी अर्धा चमचा एवढ्या प्रमाणात घेतले तर गॅस्ट्रो, सर्दी, खोकला हे आजार दूर राहतात. पोटात दुखत असेल तर साखरेबरोबर ४-५ थेंब जायफळ तेल घेण्याने आराम पडतो. मोहरीच्या तेलात जायफळ मिश्रण करुन ते जखमेवर लावले तर आराम मिळतो. चेहऱ्यावर मुरुमे येत असतील तर जायफळाचा लेप लावा, मुरुमे कमी होतील. सुरकुत्यांवरही जायफळाचा लेप प्रभावी असून त्याने चेहरा नितळही बनतो. अंगावरचे दूध सोडून मुलांना वरचे दूध चालू केल्यावर जर ते पचत नसेल, तर दुधात अर्धा भाग पाणी घाला व त्यात एक जायफळ टाकून ते उकळा व थोडे गार म्हणजे कोमट होताच वाटी-चमच्याने मुलाला पाजा. हे दूध मुलांना लगेच पचते.


शरीरातील संधिवातामुळे दुखणारे सांधे, जखम, हातपाय मुरगळणे व जुनाट सूज यावर जायफळ व मोहरीच्या तेलाचे मिश्रण चोळल्याने आराम मिळतो. याच्या मालिशने शरीरात ऊब संचारते. उत्साह येतो व शरीरातील विषारी द्रव्ये घामातून बाहेर पडतात.

पोटदुखीवर जायफळ तेलाचे २-३ थेंब साखर व बत्ताशावर टाकून सेवन केल्याने त्वरीत आराम वाटतो. दातदुखीवरही जायफळ तेलात कापूस भिजवून दुखणाऱ्या दाढेवर ठेवल्याने तेथील किडे मरतात व वेदना दूर होतात. या तेलात वेदना थांबविण्याचा गुण असतो. त्यामुळे याच्या वापराने वेदना दूर होतात.

# आसन : अर्धशलभासन

शलभ म्हणजे टोळ. या आसनस्थितीत शारीरिक आकृतिबंध टोळाप्रमाणे दिसतो. म्हणून या आसनास शलभासन असे म्हणतात. जेव्हा हे आसन एका पायाने करण्यात येते, तेव्हा या आसनास अर्धशलभासन असे म्हणतात.

**कृती :** चेहरा जमिनीकडे ठेवून प्रथम पालथे झोपा. हनुवटी जमिनीवर टेकवा. हात शरीराच्या दोन्ही बाजूंना मांड्यांना लावून ठेवा. मुठी वळलेल्या स्थितीत ठेवा, हात मांड्याखाली ठेवले तरी चालतील. श्वास धिम्या गतीने आत ओढून घ्या आणि आसनस्थिती चालू असेपर्यंत रोखून ठेवा. आता संपूर्ण शरीर एकदम ताठ करा आणि पाय जमिनीवर ठेवून दुसरा पाय साधारणतः ३० सें.मी. वर उचला. पाय सहजतेने जितका वर नेता येईल तितका वर न्या. आता पायांचे चवडे ताणा. पाच ते तीस सेकंदांपर्यंत या आसनस्थितीत राहा. नंतर पाय हळूहळू खाली आणा. आता अत्यंत धिम्या गतीने श्वास बाहेर सोडा. अशीच कृती दुसऱ्या पायाने करा. हे आसन दररोज सहा ते सात वेळा करा.



**फायदे :**

या आसनामुळे पश्चिमोत्तानापेक्षा उलट म्हणजे मागील बाजूस मेरुदंडास बाक मिळतो.

भुजंगासनामुळे शरीराच्या वरील भागास फायदा होतो; तर शलभासनामुळे कमरेखालील अवयव मजबूत होतात.

आतड्यात साठलेला मळ बाहेर काढण्याच्या कामी या आसनाची खूप मदत होते.

या आसनाच्या नित्य सरावामुळे स्त्रियांचा कंबरदुखीचा त्रास कमी होतो. तसेच गुडघे, कंबर आणि पोटावर वाढलेली चरबी कमी होते.

बध्दकोष्ठता, वातविकार, अपचन, जुलाब होणे, आम्लपित्त तसेच पोटात व आतड्यात उद्भवणारे विकार या आसनाच्या नित्य सरावाने दूर होतात.

# वाढदिवसाच्या


तरेश थोरात


श्रेया भोसले


सान्वी कोळी


श्रेया कोतावडेकर


प्राप्ती अभंगराव


सांचल


शौर्य तांबे


जिवीका


रोशनी आरसुळे


युवी भोईर


विधी निकम


अनोखी मोरे


प्रचित इंगळे


प्रतिक बांद्रे


सार्थक भोंडवे


विहान जाधव


अवनीत बोस


पियुष कारेकर




# हार्दिक शुभेच्छा



मीरा घानगुटकर


स्वरुप कोळी


अथर्व पारावे



हरप्रीत म्हात्रे


हर्षल जाधव



प्रथम बांगर


वेदांश खोल्ये



तनुजा चव्हाण


श्राव्या देशमुख


समदर्श जाधव



ईशा कोटीयन


वेदांत आवरे



जया देवकर



अर्णव जाधव


अरुषा माने


सिद्धी आरसुळे


अंश भातांब्रेकर


सान्ची जाधव


गार्गी पाटील


प्रयास आरवाडे


अंतरा पाटील

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : डोळे दोनच का ?**

**उत्तर :** आपल्या डोक्याच्या पुढे दोन डोळे असतात. त्यामुळे आपण अंतर आणि खोली यांचा अंदाज घेऊ शकतो. दोन डोळ्यांमुळे दोन भिन्न दृष्टिक्षेत्रे एकमेकांवर येतात. दोन डोळ्यांनी आपण एखाद्या वस्तूकडे पाहतो. तेव्हा दोन आकृत्या दिसतात, परंतु त्या एकावर एक अशा येऊन त्यांची एकच आकृती बनते. दोन डोळ्यात जे अंतर असते त्यामुळे ती आकृती थोडी थोडी इकडे-तिकडे सरकते. या प्रक्रियेला स्टेरिओस्कोपिक दर्शन (म्हणजे दोन चित्रांचे एकच चित्र दाखविणारे) म्हणतात. या प्रकारामुळे कित्येक प्राण्यात नसलेले खोलपणाचे भान आपल्याला येते. अन्यथा सगळेच सपाट भासले असते. आपल्याला असणारे अंतराचे भान जवळच्या वस्तूच्या संदर्भात असते. जसजसे वस्तूचे अंतर वाढते तसतसे डाव्या-उजव्या डोळ्यांनी घडविलेल्या दर्शनास कमी कमी अंतर पडत जाते.

आपला असा अनुभवच आहे, की जेवढी वस्तू दूर अंतरावर असेल तेवढी ती लहान दिसते, तिचा रंगही बदलतो, तपशील कळत नाहीसा होतो, तिच्या कडा धुसर होतात. जवळच्या वस्तू आपल्याला दूरच्या वस्तूचे अंतर मापण्यास मदत करतात. यामुळेच यथार्थ दर्शनाची सुविधा निर्माण होते आणि समांतर रेषा क्षितिजापर्यंत जातात ही समजूत चूक ठरते. दोन डोळ्यांचा हा वस्तूच्या दर्शनाच्या बाबतीत असलेला फार मोठा फायदा आहे.

**प्रश्न : माणसाची बुध्दिमत्ता कशावर अवलंबून असते ?**

**उत्तर :** आपल्या डोक्याचा आकार मोठा असला तर साहजिकच त्या प्रमाणात मेंदूचा आकारही मोठा असेल. आपल्या बुध्दिमत्तेचा आधार म्हणजे मेंदू. त्यामुळे बऱ्याच लोकांना असे वाटण्याची शक्यता आहे, की डोके मोठे असेल तर त्या मुलाला बुध्दीही जास्त असेल. पण खरेच असे असते का ? तुमच्या वर्गात पहिल्या पाचात येणाऱ्या मुलांची डोकी व सर्वात कमी गुण येणाऱ्या मुलांची डोकी गंमत म्हणून पाहा.

मेंदूचे वजन मानवाच्या बाबतीत ठराविकच असते. व्यक्ती व्यक्तीत थोडाफार फरक असतो. पण मेंदूचे भाग, त्याची कार्य करण्याची क्षमता, स्मरणशक्ती यात गुणात्मकदृष्ट्या फरक नसतो. अनुभव, वाचन, पाठांतर, पंचज्ञानेंद्रियातून प्राप्त केलेली माहिती या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे बुध्दिमत्ता. मेंदूच्या रिकाम्या पोटी विविध मार्गानी तुम्ही जेवढी ज्ञानसंपत्ती आणून टाकाल तेवढे तुम्ही बुध्दिमान. जन्मजात कोणी बुध्दिमान नसतो. ज्ञान प्राप्त केल्यानंतरच माणूस बुध्दिमान होतो. मेंदूच्या पेशी, त्यातील गोष्टी लक्षात ठेवायची क्षमता तुम्हाला बुध्दिमान बनायला मदत करायला नेहमीच तयार असतात. गरज फक्त तुमच्या प्रयत्नांचीच असते. असे म्हणतात, की जगातील अत्यंत विद्वान ज्ञानी व्यक्ती त्यांच्या मेंदूच्या केवळ २ टक्के क्षमतेचा वापर करतात. त्यामुळे लक्षात ठेवा, तुम्हीही खूप बुध्दिमान बनू शकता. फक्त अभ्यास करण्याची, परिश्रम करण्याची तयारी पाहिजे. मेंदूवर माणसाची बुध्दिमत्ता मुळीच अवलंबून नसते.

# अंतर्बाह्य गोड राहू

मित्रांनो, तुम्ही एखाद्या बागेत गेलात आणि त्या बागेची फळे खाल्लीत. जर ती गोड असतील तर तुम्ही नक्कीच त्या फळांची प्रशंसा कराल. पण ती आंबट असतील तर निश्चित असंच म्हणाल, की वरवरुन फळं चांगली दिसत आहेत पण आतून खराब आहेत. असंच आपणही जितके वरवरुन चांगले राहतो, तितकेच आतूनही चांगले राहायचे आहे. कोणाला वाईट बोलायचे नाही, कोणाची निंदा करायची नाही. निंदा करणारा दुसऱ्याने केलेलं सगळं पाप स्वत:वर घेतो. कोणाचे अवगुण पाहूनही ते प्रगट करु नये. त्याला बदनाम करुन अकारणच शेकडो अवगुण तो घेऊन टाकतो. जगात अनेकजण भेटतील आणि अशा हिंसक प्रवृत्तीच्या गोष्टींचा मार्ग दाखवतील अशांपासून दूर रहायचं आहे. आपण ज्ञानी आहोत, समजदार आहोत. आपल्याला या गोष्टींची जाणीव असणे आवश्यक आहे. सर्वांशी नम्रतेने, प्रेमाने आणि आपुलकीने वागायचे आहे. जर कोणी कटूवचन बोललं, तर उत्तरात मधूरच बोलायचं आहे. त्याकरता सत्संगाला येणं गरजेचं आहे.

मित्रांनो, जे नियमित सत्संगाला येतात, ते कधी भ्रमात पडत नाही. जर एखाद्या दुकानदाराने विचार केला, की दररोज तर दुकान उघडतो आज नाही उघडत. असं झालं, तर त्या दुकानदाराची त्या दिवशी काहीच कमाई होणार नाही, त्याचं नुकसान होईल. तसंच सत्संगाला आळस केला, उशिरा आलो. तर आपणच संतांच्या वचनांपासून वंचित राहू. मग नुकसान आपलंच आहे. जसं एखाद्याने जर नवीन घर बांधलं तर आधी तो त्याचा पाया पक्का करतो. मग त्या घराची पडण्याची शक्यता नसते. अगदी तसंच जर सत्संगाला आळस न करता आपण वेळेवर आलो. आपला सत्संगाला यायचा नित्यक्रम पक्का होईल मग आपण कुठल्याच भ्रमात पडणार नाही.

मित्रांनो, आपलं भाग्य आहे, की असा सत्संग आणि असा पूर्ण सद्गुरु मिळाला आहे. ज्यामुळे आपण चांगल्या मार्गावर चालण्याची सदैव प्रेरणा घेत आहोत. परंतु चांगले बोल केवळ ऐकण्यापुरते न ठेवता आपल्या कर्मातही आणायचे आहेत. जेणेकरुन संतांची वचने श्रवण करुन योग्य कर्म करु मग बाहेरुन आतून गोड फळाप्रमाणे बनू.

संग्राहक : अंकित चं. जाधव

संदर्भ : शहनशाह (पुस्तक)

आपले जिल्हे

# परभणी

मुख्यालय : परभणी

तालुके : परभणी, जिंतूर, गंगाखेड, पूर्णा, मानवत, सेलू, सोनपेठ, पाथरी, पालम

नद्या : गोदावरी ही प्रमुख नदी, पूर्णा, दुधना व कापरा

सीमा : पूर्वेस नांदेड व हिंगोली जिल्हे. दक्षिणेस लातूर, बीड जिल्हे, पश्चिमेस बीड व जालना जिल्हा, उत्तरेस हिंगोली जिल्हा

प्रमुख शेतकी उत्पादने : मुख्य पीक ज्वारी, गहू, कापूस, गळिताची धान्ये, ऊस, द्राक्षे, केळी

धरणे : कापरा नदीवर व मासळी नदीवर

## विशेष माहिती :

❒ प्रभावती देवीचे प्राचीन मंदिर परभणी शहरात आहे; त्यामुळे या शहराला परभणी हे नाव पडले असे मानले जाते.

❒ गंगाखेड येथे संत जनाबाईंची समाधी आहे.

❒ परभणी शहरात मराठवाडा कृषी विद्यापीठ आहे.

❒ १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन हिंगोली हा नवीन जिल्हा निर्माण केला गेला. हिंगोली हा मराठवाड्यातील आठवा जिल्हा होय.

❒ परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यात लमाणांचे तांडे आढळतात.

❒ पूर्णा नदीच्या काठावरील तालुक्याचे ठिकाण, मनमाड-काचीगुडा लोहमार्गावरील रेल्वे जंक्शन. येथून जवळच कंठेश्वर या गावी पूर्णा व गोदावरी नद्यांचा संगम होतो.

❒ ताडकळस- कापूस संकलन केंद्र आणि जिनिंग व प्रेसिंग कारखाना

❒ जिंतूर - जवळच्या परिसरातील गुहांमध्ये जैन शिल्पे

❒❒❒





# धर्म म्हणजे काय ?




आज समाजात धर्म तर आहेत, धर्मासाठी संघर्षही आहे, जाती-धर्मांच्या भिंती आहेत. पण माणसाला हे कळत नाही, जाणवत नाही की अशा जातीपातीच्या वादांचे मूळ हेच आहे, की माणसाने धर्माचे सार ओळखलेच नाही. तर धर्माचे सार काय आहे ? धर्म म्हणजे काय ? येशू ख्रिस्त, राम, कृष्ण, हजरत मोहम्मद साहेब, श्री गुरु नानकजी महाराज यांनी कोणत्या धर्माची स्थापना केली ? आणि आपण जे माणुसकी सोडून वागतो, तरीही आपण स्वत:ला धार्मिक म्हणवतो, का ? तर आपण पूजा पाठ करतो म्हणून ? की तीर्थयात्रा करतो म्हणून ? की एखादा दिवस पवित्र मानून त्या दिवशी उपवास करतो म्हणून ? की माळ जपतो म्हणून ? हे सर्व करण्याला आपण धर्म मानत आहोत. गुरु, पीर, पैगंबरांनी धर्माची ओळख सांगितली आहे, की-

**दया धर्म का मूल है, पाप मूल अभिमान।**
**तुलसी दया ना छोडीये, जब लग घट में प्राण।**

धर्माची परिभाषा येथे सांगितली आहे, की दया धर्माचं मूळ आहे. परंतु आपण तर विधींनाच धर्म मानत आलो आहोत. म्हणूनच आपण माणुसकीपासून दुरावलो, धर्माच्या मुळापासून दुरावलो, धर्माच्या खऱ्या अर्थाचा लोप झाला. म्हणूनच सगळीकडे हा दुर्गंध, जाती-धर्माचे वाद, हे अत्याचार पसरले आहेत आणि माणुसकीचा दर्जा खालावत चालला आहे आणि माणसाला लोभ, वासना अशा विकारांनी ग्रासले आहे. अशा मनुष्याला उभारण्यासाठी, त्याला माणुसकीची खरी ओळख होण्यासाठी, त्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव होण्यासाठीच अशा संत समागमांचे आयोजन केले जाते.

(सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या प्रवचनावर आधारित)


# हसा मुलांनो हसा



गोट्या : सर, मराठीमध्ये एक शब्द असा आहे. त्याचे उच्चार सगळे चूक करतात. त्याचा उच्चार बरोबर असं कोणीच सांगत नाही, असा कुठला शब्द आहे ?
सर : बरं, मी उद्या डिक्शनरी पाहून सांगतो.
(दुसऱ्या दिवशी) गोट्या, बाळ तूच सांग, तो शब्द! ज्याचा उच्चार सगळेच चूक करतात, तो शब्दच फळ्यावर लिहून दाखव.
गोट्या : हो सर, आता लिहितो (गोट्या फळ्यावर लिहितो - चूक) आता, तुम्ही सांगा याचा उच्चार.



बाबा : बन्या, अरे सगळ्या विषयात C ग्रेड. कधीतरी C च्या वर गेलेला रिपोर्ट दाखव.
बन्या : बाबा, हा घ्या ब्लड रिपोर्ट यावर मिळालाय A+



अधिकारी : मुलाखतीसाठी आलेल्या प्रत्येक उमेदवाराने स्वत:चे चांगले आणि वाईट गुण सांगायचे.
गण्या : सर मी कष्टाळू आहे, प्रामाणिक आहे. चोरी करत नाही, आळशी नाही, शूर आहे, सर्वांना मदत करतो, व्यसन करत नाही, सर्वांचा मान ठेवतो. कमी खातो, कमी झोपतो, जास्त काम करतो....
अधिकारी : वा वा! छान! तुमच्यात तर सारे गुणच गुण आहेत. बरं आता दुर्गुण सांगा.
गण्या : सर, माझ्यात फक्त एकच दुर्गुण आहे - मी नेहमी खोटं बोलतो.



सरदार होशियारसिंग : फायर ब्रिगेड, माझ्या घराला आग लागली आहे. लवकर या.
फायरब्रिगेडवाले : अहो, पण कुठे आणि कसं यायचं ते नीट सांगा.
सरदार : (रागाने) ओये, माझ्या घरी यायचं आणि लाल गाडी घेऊन घंटा वाजवत यायचं, एवढं पण कळत नाही ?

बन्या सैन्यामध्ये दाखल झाला. परेडच्या वेळी सर्व सैनिकांसोबत रांगेत उभा होता.

कॅप्टन : आपल्याला एक मोठ्या मोहिमेवर जायचं आहे. तिथे मोठा खतरा आहे. तिथून जिवंत परत येणे कठीण आहे; परंतु जो कोणी परत येईल त्याला शौर्यपदक देण्यात येईल. ज्याला भिती वाटत असेल त्याने एक पाऊल मागे जा. (सर्वजण मागे जातात. बन्या तिथेच थांबतो.)

कॅप्टन (खूष होत) : शाब्बास! एकच जवान फक्त धाडसी आहे. बाकी सारे घाबरट निघाले. मी तुमची परीक्षा पाहिली. याला मी शौर्यपदक देत आहे. बरं तू एवढं धाडस आणलं कुठून ?

बन्या : सर, भितीने मी इतका घाबरलो होतो, की जागचा हलू शकलो नाही.

---

रमा : काय गं ठमा, डोक्यावर काय घेऊन चाललीस ?

ठमा : मांजर. कालपासून मला स्वप्नात खूप उंदिर दिसतात. म्हणून म्हटलं मांजर पाळावी.

रमा : अगं वेडे, स्वप्नातले उंदिर काय असतात होय ?

ठमा : मग, माझ्या टोपलीत तरी कुठे खरी मांजर आहे ?

---

बाबुराव : कंडक्टर, दीड तिकीट द्या. एक फुल माझ्यासाठी, हाफ बायकोसाठी.

कंडक्टर : बायकोचं हाफ का ?

बाबुराव : ती डोक्यानं जरा अर्धवटच आहे.

कंडक्टर : बरं,मी तिचं हाफ तिकीट देतो; पण तुम्हाला मात्र दीड तिकीट घ्यावं लागेल.

बाबुराव : ऑ ? आणि ते कशापायी ?

कंडक्टर : कारण तुम्ही दीड शहाणे आहात, म्हणून!

---

गुरुजी : बंड्या, बावन्न गावांची नावं लिही बरं!

बंड्या : हो गुरुजी, आता लिहितो.

गुरुजी : हं, वाचून दाखव.

बंड्या : बारामती, चाळीसगाव

# व्यंकोजी राजांना अनुग्रह

समर्थ चिकोडीहून निघाले, ते मार्गामध्ये शरण येतील त्यांना अनुग्रह देत देत रामेश्वराकडे निघाले. श्री अप्पय्या दीक्षित बडदेस, हे कावेरी नदीच्या उत्तर भागी अडपळे या गावी राहत असत. त्यांची भेट घेतली व पुढे तंजावरास जाण्यासाठी निघाले. तेव्हा व्यंकोजी राजे नेण्यास आले व राहण्याची वगैरे व्यवस्था करुन स्वत: सेवेस राहिले. त्यांच्या पदरी आंध्र देशाचे एक विद्वान ब्राह्मण होते. त्यांना तेथील राजे गुरुप्रमाणे मानत. त्यांना व्यंकोजी राजांनी समर्थांचा एवढा सत्कार केला ते रुचले नाही. कदाचित आपलेही वजन आता कमी होण्याची शक्यता आहे असा क्षूद्र विचार मनात येऊन ते समर्थांकडे पाहत म्हणाले, "ब्रह्मचारी असून बरोबर स्त्रिया असणे उचित नाही."

हे ऐकताच समर्थांनी त्यांना काही उपदेश केला. ते म्हणाले, "आक्रमक वृत्ती हा पुरुषाचा गुण आहे आणि आज्ञापालन करणे म्हणजे नम्रता हा स्त्रीचा गुण आहे. साधूच्या ठायी हे दोन्ही गुण समन्वयाने असतात. तो आक्रमक नसतो आणि नम्रही नसतो. तो शांत, गंभीर असा स्थिर असतो. त्यामुळे तो मोहापासून मुक्त असतो." समर्थांच्या ह्या खुलाशाने त्या ब्राह्मणाला पश्चाताप झाला आणि तो म्हणाला, "मी केवळ द्वेष बुध्दीने बोललो, याची क्षमा करावी."

तेव्हा समर्थ म्हणाले, "तुम्ही म्हणाला तेही लौकिकरीत्या खरंच आहे." त्यानंतर त्या ब्राह्मणाने मोठ्या समारंभाने समर्थांना आपल्या घरी नेले आणि अत्यादराने पूजा करुन त्यांचा अनुग्रह घेण्यास प्रेरणा दिली. त्याप्रमाणे महाराजांनीही समर्थांचा अनुग्रह घेतला. नंतर काही दिवसांनी समर्थ परत जाण्यासा निघाले. तेव्हा राजांनी व इतर मंडळींनी विनंती केली, की आपण लवकर परत जाऊ नये.


त्यावेळी समर्थांनी भिकाजी गोसावी यांना सांगून तंजावरास मठ स्थापन केला. भिकाजी गोसाव्यांनी कोणाची नेमणूक करावी? अशी प्रार्थना केल्यावरुन मौनी गोसावी यास आज्ञा झाली. समर्थ निघाले, त्यावेळी सर्वांनी विनंती केली, "आपल्या इच्छेप्रमाणे प्रतिवर्षी उत्सव करण्याची परवानगी असावी." त्याप्रमाणे करण्यास समर्थांनी आज्ञा दिली व ते रामेश्वरास गेले.

समर्थांची पहिली तसबीर भिकाजी बाबा यांनी काढली. ती चाफळच्या मठात आहे. दुसरी शिरगाव येथे लक्ष्मण गोसावी यांनी काढली. ती त्यांच्याच शिरगावच्या मठात आहे.

रामेश्वराहून परत येताना मंचाळ क्षेत्री राघवेंद्रस्वामी होते, त्यांना भेटून उडपीस व सुब्रह्मण्य क्षेत्रास गेले. तेव्हा तेथील आचार्यांना

उर्वरीत पान क्र.४९ वर

# दहिहंडी



संस्काराने भरलेले अमुचे सारे सणवार
गुणवत्ता परि तयामधली झाली हद्दपार ।।ध्रु।

दह्या दुधाचे माठ फोडीत होता कान्हा
गोकूळ नगरी दुधाची पोरांना दूध मिळेना
कंसाचा वर अधिकार।। १।

जमवून बाळ गोपाळ गोल धरीती फेर
हाती हात धरुनी चढती खांद्यावर
खाती लोणी भरपूर ।।२।।

नेऊ नये कुणी गोरस त्या कंसाच्या नगरी
यासाठी श्रीकृष्णाची लीला ही होती सारी
मुले असावीत भरदार ।।३।।

आज चालला खेळ दहीहंडी गल्लोगल्ली
नोटांची त्यांच्यावरती रांग लागती भली
मनोरे उंच उंच रचणार ।।४।।

हातपाय मोडती कुणाचे जाती कुणाचे प्राण
जागृत समाज व्हाया अध्यात्माचे व्हावे ज्ञान
सुंदर असावे विचार ।।५।।

सणवार हे सारे असती एकत्वाचे मूळ
अज्ञान नसावे कोठे, उच्चाटन व्हावे समूळ
व्हावा सुंदर संसार ।।६।।

कविता : सुरेश तिर्लोटकर

# किट्टी



चित्रांकन व लेखन : अजय कालडा







स्वच्छ भारत
स्वच्छ भारत
किट्टी, तू अगदी बरोबर बोललीस. स्वच्छतेमुळे आपले तन-मन दोन्ही सुंदर व स्वच्छ राहतात तसेच वातावरण देखील प्रसन्न राहते.
मॅडम, मी माझ्या घरात-घराबाहेर तसेच आजूबाजूच्या साफ-सफाईबाबत विशेष लक्ष देते.
मुलांनो, आज तुम्ही सर्वांनी ऐकलं व पाहिलं असेल, की संत निरंकारी मिशन देखील दरवर्षी विशेष स्वच्छता अभियान तसेच वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करते.




हो मॅडम, मी टी.व्ही. वर त्याबाबत पाहिलं आहे; अनेक महिला-पुरुष हातात झाडू घेऊन रस्ते साफ करुन स्वच्छता अभियानाचा प्रचार-प्रसार करत होते.
अगदी बरोबर किट्टी. मुलांनो त्यांची ही वागणूक आपण देखील आत्मसात केली पाहिजे. कारण भारत आपला देश आहे आणि आपण ज्या देशात राहतो तिथला प्रत्येक रस्ता व परिसर स्वच्छ ठेवणं हे आपलं कर्तव्य आहे.
तुम्ही अगदी बरोबर बोलत आहात मॅडम
हो मॅडम, आम्हीदेखील या अभियानात सामील होऊन स्वच्छतेला प्राधान्य देणार.
फार छान मुलांनो, आजपासून तुमचं देखील कर्तव्य आहे, की आपल्या आजूबाजूला कचरा जमा होऊ द्यायचा नाही. कचरा पेटीचा नेहमी वापर करायचा. आणि ऐका, जर कोणी कचरापेटीशिवाय इतरत्र कुठं कचरा टाकून अथवा थुंकून घाण करत असेल तर त्याला देखील या गोष्टीपासून अडवायचं आहे.


मॅडम, ह्याचबरोबर दर रविवारी आम्ही आमच्या परिसरात फिरुन लोकांना स्वच्छतेबाबतचे फायदे सांगून त्यांना जागृत करणार.
फार छान मुलांनो, तसं देखील आपण स्वच्छतेच्या कामात लाज बाळगायची नाही. लाज तर घाणीबद्दल करायची.
अगदी बरोबर मॅडम! स्वच्छता तर आपली शान असली पाहिजे.




राजवर्धन


अन्वी


स्वरा


आदर्श


सलोनी




साधक


रिदवी


मृदूला


हर्षद


भार्गवी



कथा

# मुंग्यांशी पंगा

एका जंगलात एक नाग राहत होता. भक्ष्य शोधण्यासाठी तो फिरत असताना त्याला एक झाड दिसलं. झाडावर पक्ष्यांची अनेक घरटी होती. नाग झाडावर चढला. त्याने घरट्यातील पक्ष्यांची अंडी फस्त केली आणि तिथेच एका ढोलीत लपून बसला. पुढे तो नित्यनेमाने घरट्यातील अंडी आणि पक्ष्यांची पिले खाऊन चांगला धष्टपुष्ट झाला. त्याच्या भितीने पक्षी घरटी सोडून निघून गेले. नागाला आता अहंकार झाला. आपल्याला सर्वजण घाबरतात. आता आपणच या जंगलाचे खरे राजे आहोत असे त्याला वाटू लागले.

एके दिवशी तो भक्ष्य शोधण्यासाठी झाडावरुन खाली उतरला. झाडाच्या मुळाशी बिळे होती. त्यात उंदीर राहत होते. आता नागाने उंदरांना फस्त करायला सुरुवात केली. उंदीर खाऊन तो सुस्तपणे पडला असताना त्याला उन्हाचे चटके बसू लागले. त्याला आता घराची गरज वाटू लागली. त्याच्या समोरुन काही मुंग्या जाताना त्याने पाहिल्या. मुंग्यांना त्याने थांबायला सांगितले पण मुंग्या आपल्या शिस्तीने पुढे निघून गेल्या. नागाला राग आला. तो सळसळत त्यांच्या वारुळापाशी गेला आणि म्हणाला, "सगळ्या मुंग्यांनी बाहेर पडा. मला राहण्यासाठी हे वारुळ खाली करुन द्या." मुंग्यांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले आणि त्या आपले खाद्यपदार्थ जमा करु लागल्या. या क्षुद्र मुंग्या मला घाबरत नाही म्हणजे काय? नागाचा अहंकार दुखावला. त्याने शेपटीचा फटका वारुळावर मारला आणि वारुळात राहण्यासाठी तो आत शिरला. त्याच्या अशा वागण्याने मुंग्या चवताळल्या. साऱ्या मुंग्यांनी नागाच्या सर्वांगाला कडकडून चावा घ्यायला सुरुवात केली. नाग विव्हळू लागला. सैरावैरा पळू लागला. मुंग्याशी घेतलेला पंगा त्याला चांगलाच महागात पडला. रक्ताळलेले अंग घेऊन तो वेगाने दुसरीकडे पसार झाला.

तात्पर्य : कुणाला क्षूद्र किंवा लहान समजू नये. ईश्वराने प्रत्येकाला काही ना काही उत्तम देणगी दिलेली आहे.

(साभार) ❑❑❑

# देवता

देवात देव
गणेश महान
ज्ञानास साऱ्या
जगात मान

विद्येची देवता
माता सरस्वती
विद्येला साऱ्या
जगात पूजती

धनाची देवता
लक्ष्मी माता
धनाची किंमत
खूप जगता

हनुमानासम
होऊनी बलवान
कष्टाने मिळवावे
आपले धन

सद्‌गुरु आहेत
सगळ्यांचे गुरु
ज्ञान घेऊनी
प्रगती करु

कविता : प्रा. देवबा पाटील (बुलढाणा)

# संस्कृती संवर्धनाचं पर्व

गणपती हे महाराष्ट्राचं आराध्य दैवत. गणपती हा सुखकर्ता, दु:खहर्ता, विघ्नहर्ता आहे. गणेश म्हणजेच - सत्व, रज, तम या त्रिगुणांचा अधिपती म्हणजे श्री गणेश. कोणतीही विघ्नं आली तरी गणपती आपल्या सामर्थ्याने त्याचा विनाश करतो आणि लोकांना आनंद देतो. १४ विद्या आणि ६४ कला यांनी मंडित असणारा श्रीगणेश बुध्दी आणि विद्येचा स्वामी मानला जातो.

गणानात्वां गणपती हे ऋग्वेदातलं सूक्त गणपतीचं मानतात. सर्व शुभ संस्कारात आरंभी गणेशाची पूजा करण्याचा प्रघात आहे. सर्व देवांचा सेनापती म्हणजेच श्रीगणेश हे सानथोरांना सर्वश्रुत आहेच. गणेश बुध्दीदायक, मंगल करणारं, नेतृत्वगुण अंगी असणारं असं दैवत आहे. हे सर्व गुण आपल्यात यावेत, यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. या सर्व गुणांची उपासना करायला हवी. गणपतीमध्ये असलेले गुण आपल्यात यावेत, हाच उद्देश हा उत्सव साजरा करण्यामध्ये आहे.

गणपतीची मूर्ती छोटी; पण त्याची श्रध्दा मोठी हवी. गणपती हा आनंद देणारा, सौख्य देणारा आहे अशी भक्तांची श्रध्दा असते म्हणून या दिवसांत काही काळ तरी माणसं आपली दु:खं विसरतात. गणेशाचं मूळ रुप निर्गुण निराकार आहे हे जाणून त्याची पूजा करताना आपल्या आनंदात इतरांना सामील करतात. ईश्वराची पूजा करताना आपल्यात बदल होणे आवश्यक आहे. आपल्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. आत्म्याचा अभ्यास म्हणजे अध्यात्म. त्यामुळे आत्मा-चैतन्य-निसर्ग या गोष्टी जाणल्या पाहिजेत. प्रत्येकाविषयी आदराची भावना पाहिजे. जी गोष्ट करायची ती प्रत्येक गोष्ट आनंदाने, उत्साहाने केली पाहिजे. पर्यावरणाचं रक्षण केलं पाहिजे. पार्थिव पूजा म्हणजे पृथ्वीची पूजा. म्हणून गणेशमूर्ती ही मातीचीच बनवली जाते. त्या पृथ्वीचं रक्षण केलं पाहिजे. वसुंधरेने शेती पिकवली आहे. त्याचा आनंदोत्सव म्हणून गणेश पूजा, ती आनंदाने, प्रेमाने केली पाहिजे. गणेशाला जी पत्री, दुर्वा वाहिली जाते त्या सर्व औषधी वनस्पती आहेत. त्यादृष्टीने गणेशाला प्रिय असणाऱ्या गणेशपत्री म्हणजे २१ वनस्पतींचा अभ्यास होणं आवश्यक आहे. गणेशपत्रीत चिमुकल्या दुर्वांपासून पिंपळासारख्या मोठ्या वृक्षांची पानं, तसंच हिमालयात आढळणाऱ्या देवदारपासून वृक्षाच्या आधाराने उभ्या राहणाऱ्या जाईच्या वेलीचासुध्दा त्यात समावेश आहे. जसं तुळस.

द्विपर्णी शमी, त्रिपर्णी बेल, अणकुचीदार टोकाचं पिंपळपान, गोलसर टोकाचं रुईचं पान असे प्रकार येतात.

जो सत्कर्म करतो, सत्कार्य करतो, त्याला देव पावतो असं म्हणतात. गोरगरीबांना पीडितांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे. सर्वांशी चांगलं वागावं, माणुसकी जपणं, आनंदाची देवाणघेवाण करणं हाच या उत्सवाचा प्रमुख हेतू आहे.

गणपती हा मातृ-पितृ भक्त होता. म्हणूनच त्याने पृथ्वी प्रदक्षिणा करताना आई-वडिलांनाच प्रदक्षिणा घातली. असंच प्रत्येकाने आई-वडिलांना, ज्येष्ठांना मान दिला पाहिजे, त्यांचा आदर केला पाहिजे. त्यांचं सर्वप्रकारे रक्षण केलं पाहिजे. इच्छा व धारणा चांगली हवी. मनाची एकाग्रता झाली पाहिजे.

ध्वनीप्रदूषण, जलप्रदूषण, वायूप्रदुषण टाळलं पाहिजे. या गोष्टी होणार नाहीत याकडे लक्षं दिलं पाहिजे. पर्यावरण जपलं पाहिजे. पाणी अत्यंत काटकसरीने, जपून वापरलं पाहिजे. यासाठी लोकजागृती, जन-प्रबोधन, आरोग्य, स्वच्छता, निर्व्यसनीपणा या गोष्टी घडल्या पाहिजेत. वैज्ञानिक दृष्टिकोन हवा. हिंदू संस्कृती आपल्याला हेच सांगते, ज्या गोष्टी हितकारक आहेत, त्या कराव्यात. ज्या गोष्टींमुळे बाधा येते, त्या करु नयेत. हे पथ्य पाळलं पाहिजे. तरच त्या उत्सवाला बाजारी, वाईट स्वरुप येणार नाही.

□□□

## भक्ति शिवाय स्वप्नातही सुख मिळणार नाही

भक्तिशिवाय स्वप्नातही सुख मिळणार नाही. कित्येक लोक सकाळी उठून डोळे बंद करुन जपमाळ जपण्याला; कर्मकांड करण्याला भक्ती समजतात, वास्तविक ही भक्ती नाही. कधीही अशा भ्रमांत राहू नका. भक्तीचा अर्थ आहे ईश्वराला जाणून संतांची सेवा करणे.

तीन गोष्टी कधीही विसरु नका, आपल्या जीवनात ह्यांचा वापर केल्याने तुमच्या भक्तिमध्ये कोणीही बाधा आणू शकत नाही. ह्या तीन गोष्टी म्हणजे - सेवा, स्मरण आणि नित्यप्रति सत्संग करणे. ह्या गोष्टींनी कधीही कमतरता येणार नाही. जर तुम्ही जाणून-बुजून सेवा, सत्संग, स्मरण केले नाही तर भक्तिमध्ये बाधा येईल. जर तुमच्यामध्ये नम्रता नसेल, महापुरुषांच्या चरणी नतमस्तक झाला नाहीत तर भक्तिमध्ये उतरती कळा येण्यास प्रारंभ होईल. कित्येक लोक विचारतात, भक्ती कोणत्या वेळी केली पाहिजे, स्मरण केव्हा करायला पाहिजे. भक्तजनांनो, भक्ती करण्यासाठी कोणतीही निश्चित वेळ नसते, ज्ञानीजन प्रत्येक श्वासागणिक भक्ती करतात.

**- बाबा अवतारसिंहजी महाराज**

# सामान्य ज्ञान



१) देशातील पहिली मोनोरेल कोणत्या मार्गावर सुरु झाली ?

अ) ठाणे-मुंबई ब) चेंबूर-सातरस्ता

क) चेंबूर-वडाळा ड) वरळी-वांद्रे

२) देवभूमी असे कोणत्या प्रदेशाला म्हटले जाते ?

अ) हिमाचल प्रदेश ब) उत्तराखंड क) काश्मीर ड) मध्यप्रदेश

३) समुद्राचा मोठेपणा व्यक्त करण्यासाठी कोणता शब्द वापरतात ?

अ) मोठ्ठा ब) अथांग क) भव्य ड) उत्तुंग

४) पुण्यात लाल महाल कोणी बांधला होता ?

अ) शायिस्तेखान ब) औरंगजेब क) शहाजी ड) दादोजी कोंडदेव

५) रामदास स्वामींनी ठिकठिकाणी कोणत्या दैवताची मंदिरे उभारली ?

अ) हनुमान ब) श्रीराम क) श्रीकृष्ण ड) महादेव

६) शाकुंतल ह्या महाकाव्याचे लेखक कोण ?

अ) भरत ब) दंडी क) कालिदास ड) बाणभट्ट

७) दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका म्हणजे -

अ) मासिक ब) पाक्षिक क) त्रैमासिक ड) दैनिक

८) १४ सप्टेंबर १८९४ पासून कोणत्या सार्वजनिक उत्सवाची सुरुवात झाली ?

अ) शिवजयंती ब) रक्षाबंधन क) दहीहंडी ड) गणेशोत्सव

९) बळीराजापुढे दान मागण्यासाठी श्रीविष्णूंना कोणते रुप घ्यावे लागले ?

अ) वामन ब) वराह क) मत्स्य ड) परशुराम

१०) विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत कोणत्या देशाने चषक जिंकला ?

अ) भारत ब) जर्मनी क) फ्रान्स ड) स्पेन

उत्तरे इतरत्र

पक्षीजगत

# शिकारीत तरबेज असणारा

# जांभळा बगळा



पाणकाड्या बगळा या नावानेही ओळखला जाणारा हा जांभळा बगळा याला जांभळा कोहकाळ किंवा जांभळा ढोक असंही म्हणतात. इंग्रजीमध्ये या पक्ष्याला पर्पल हेरॉन असं म्हणतात. आफ्रिका, युरोप आणि आशिया खंडात आढळणारा हा सुंदर पक्षी भारतात सर्वत्र आढळतो. हा स्थलांतर करणारा पक्षी असून, त्याच्या रंगसौंदर्यामुळे तो बगळावर्गातील इतर सर्व पक्ष्यांमध्ये उठून दिसतो.

हा जांभळा बगळा ३१-३८ इंच लांब असून, पंखांचा आवाका ४७-६० इंच असतो. हा पक्षी वजनाला अतिशय हलका म्हणजे अर्धा ते दीड किलो वजनाचा असतो. याची मान पिवळसर व लांब असते व त्यावर निळसर रेषा असतात. ही लवचिक व रंगीत मान एखाद्या सापासारखी वाटते. याची चोच व पाय पिवळे असतात व पाठ गदड राखाडी रंगाची असते. लांब, बाकदार व टोकाकडे निमुळत्या होत जाणाऱ्या चोचीमुळे उथळ पाण्यातून खाद्य मिळवणं यांना सोपं जातं. हा बगळा आकाराने राखाडी बगळ्यापेक्षा छोटा असतो. मादी व नर जांभळ्या बगळ्यात फारसा फरक दिसून येत नाही.

जांभळा बगळा समूहात राहतो. पांढरा-जांभळा-पिवळसर असा मिश्र रंगातील पक्ष्यांचा थवा बघणं, हा अतिशय सुंदर अनुभव असतो. हा पक्षी माणसांपासून बिचकून राहतो. नदी, तलाव,समुद्र अशा पाणथळ जागी आढळणारा हा पक्षी नदीकाठी एकटाच वाट चुकल्यासारखा फिरताना दिसतो, तर कधी पाण्यात ध्यान करत शिकारीसाठी सज्ज झालेला दिसतो. पाण्यात शांतपणे उभं राहून खाद्य पकडण्यात हा तरबेज असतो.

साप, बेडूक, मासे, गोगलगाई, किडे, कासवाची पिल्ले, खेकडे आणि पाण्यातील इतर जीव हे यांचं मुख्य खाद्य आहे. हा पक्षी समूहात राहत असल्याने याचं घरटंही वसाहतीतच आढळतं. पाणथळ जाजेगवळील झाडीत मोठ्या काट्या, मऊ गवत, पानं यांपासून हा पक्षी आपलं घरटं तयार करतो. इतर बगळ्यांच्या प्रजातींपेक्षा या पक्ष्याचं घरटं मोठं असतं.

प्रजनन काळात मादी एका वेळी दोन ते पाच फिकट हिरवट-निळसर रंगाची अंडी घालते. ही अंडी २४-२५ दिवस उबवल्यानंतर पिल्लं बाहेर येतात. तीन महिन्यांच्या संगोपनानंतर ती उडण्यास सक्षम होतात. नर व मादी दोघं मिळून पिल्लांचं संगोपन व संरक्षण करतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव



संग्राहक : विनोद अधिकारी (भूजलतज्ज्ञ)

# दिसतं तसं नसतं

एक होता राजा. राज्यातल्या एका फकिरावर त्याची नितांत श्रध्दा होती. तो फकिर त्या राजाला नेहमी सांगत असे, "बाबा रे, माझ्याबद्दल आदर बाळगू नकोस. या जगात जे लोक आपल्याला आज खूप आदर देतात तेच लोक उद्या अनादरही करतात. राजा, कदाचित उद्या तू सुध्दा हेच करशील." पण राजा आपले म्हणणे सोडत नव्हता. तो म्हणत असे, "तुमची गोष्टच मुळी वेगळी आहे. तुमचा अनादर करावा असं काहीच नाहीये तुमच्यात."

एकदा तो राजा गेला शिकारीला. भटकता भटकता तो जंगलातल्या सरोवराच्या काठी

आला. अचानक त्याला दिसलं, की सरोवराच्या पलीकडे किनाऱ्यावर एका झाडाखाली तो फकिर निवांतपणानं पहुडलाय. पण खरी धक्कादायक गोष्ट पुढेच आहे. त्या फकिराजवळ एक बुरखा घातलेली स्त्री उभी होती. तिच्या हातात नक्षीदार सुरई होती. फकिराच्या हातात प्याला होता. हे सारे पाहून त्या राजाला प्रचंड धक्का बसला. त्याच्या डोळ्यांवर त्याचाच विश्वास बसेना. त्याच्या मनात आले, "अरेरे ! ज्याला आपण एवढा प्रचंड आदर दिला तो देखील शेवटी असाच निघावा !"

राजानं ठरवलं पुढे जाऊन लांबूनच फकीराला नमस्कार करावा. म्हणजे त्याला कळेल, की त्याचं खरं रुप मला समजलं आहे. राजानं थोडं पुढे जाऊन लांबूनच नमस्कार केला.

फकीर म्हणाला, "राजा, इतक्या लांबून नमस्कार करुन जाऊ नकोस. जवळ ये माझ्या."

राजा म्हणाला, "छे, छे ! मी जे काही पाहायचं ते पाहिलं. आता सगळं संपलंय."

फकीर म्हणाला, "राजा, क्षणभर थांब सगळं काही संपलं नाहीये. जरा जवळ ये तर खरं."

राजा जवळ जाऊन फकीराला म्हणाला, "काय आहे हे पापकर्म, हा जंगलातला एकांत, ही स्त्री, ही शराब ! काय बघतोय मी हे !"

त्याच क्षणी त्या फकिरानं त्या स्त्रीच्या चेहऱ्यावरील बुरखा दूर केला. ती फकिराची आई होती. फकिरानं हातातली सुरई उघडी केली. आत थंड, स्वच्छ निर्मळ पाणी होतं.

फकिर म्हणाला, "राजा, आता तू जाऊ शकतोस, पण आता मात्र खरेच सारे काही संपले आहे. आता तू परत माझ्याकडे येऊ नकोस. माझ्याबद्दल आदर व्यक्त करु नकोस. कारण तू देखील इतरांसारखा वरवर पाहणाराच निघालास, उथळ दृष्टीचा निघाला. पण राजा एक लक्षात ठेव, दिसतं तसं नसतं !"

**तात्पर्य :** कुठल्याही गोष्टीची खात्री केल्याशिवाय त्याविषयी आपले मत व्यक्त करु नये.

❑❑❑

पान क्र. ३४ वरुन


फार आनंद झाला. त्यांनी समर्थांना काही दिवस ठेवून घेतले व आदरसत्कार केला. ते मारुतीचा अवतार आहेत, अशी त्यांची खात्री झाली.

ह्याप्रमाणे समर्थ तीर्थक्षेत्रे पाहत पाहत पुन्हा परत कृष्णातीरी आले. हे वर्तमान शिवाजी महाराजांना लागताच राजे तोरगलपर्यंत सामोरे जाऊन त्यांना चाफळच्या मठात घेऊन आले.

शिवाजी महाराजांची समर्थांच्या ठिकाणी भक्ती केवळ अनुपमेय होती. समर्थांची स्वारी बाहेरगावी गेली म्हणजे त्यांना मुळीच चैन पडत नसे व ते परत आले म्हणजे केवळ अमृत मिळाल्याप्रमाणे त्यांना आनंद होत असे. हीच स्थिती यावेळेस झाली. दोन दिवस चाफळमध्ये राहून त्यांनी तंजावरकडील इत्यंभूत हकीकत समर्थांना विचारुन घेतली व मग ते रायगडी निघून गेले.

❍ क्रमशः

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) क
२) अ
३) ब
४) ड
५) अ
६) क
७) ब
८) ड
९) अ
१०) क

श
ब्द
को
डे १७०

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गै | | अ | मे | रि | का |
| नि | र | र्थ | क | | | र्ब |
| | ह | | रा | ज | स्था | न |
| बा | ज | री | | पा | | |
| हे | र | | म | न | ग | ट |
| र | | द | हा | | | पा |
| | भा | | रा | ज्य | पा | ल |
| धृ | त | रा | ष्ट्र | | च | |



।। तू ही निरंकार ।।
वैर - द्वेषाच्या पाडून भिंती
प्रेमाचे पूल बांधत जाऊया
महालक्ष्मी
सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...
लग्न बस्त्याची खास सोय !
शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका
अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन
THE COMPLETE FAMILY SHOWROOM
मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते
सद्गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...
सद्गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है
९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

